**रंगारंग गजरा**
**आणि**
**चित्रपट वासुदेव बळवंत फडके**

२७ एप्रिल २००८ रोजी महाराष्ट्र मंडळ न्यूयॉर्कने मराठी रसिकांसाठी सादर केले दोन विविधरंगी कार्यक्रम 'रंगारंग गजरा' आणि चित्रपट 'वासुदेव बळवंत फडके'.

'रंगारंग गजरा' हा कार्यक्रम म्हणजे मनमोकळया आठवणी, गाणी, गप्पा आणि नकला यांची एक अनौपचारिक मैफल होती. ह्यात सहभागी होते टीव्ही मुलाखतकार सुधीर गाडगीळ, अभिनेत्री व चित्रपट निर्माती स्मिता तळवलकर, राजकीय नकला साकारणारे दीपक देशपांडे व 'टिक्ल ते पॉलिटिक्ल' फेम 'सारेगम स्टार' त्यागराज खाडिलकर. प्रेक्षकांनी या रंगारंग गजऱ्याचा अगदी मनमुराद आस्वाद घेतला.

त्यागराजजींच्या 'ओंकार स्वरुपा'ने कार्यक्रमाची सुरेल सुरुवात केली. त्यानंतर सुधीरजींच्या ओघवत्या निवेदनाबरोबर बहारदार गप्पांची ही मैफल दोन तास मस्त रंगली. स्मितातार्ईनी त्यांचे सुप्रसिध्द चित्रपट, कळत नकळत, चौकट राजा यांच्या चित्रीकरणाच्या वेळी त्यांना भावलेले प्रसंग सांगितले. सुधीरजींनी खुशवंत सिंग, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, चित्रकार एम. एफ. हुसेन अशा अनेक मान्यवरांचे काही मजेदार किस्से सांगून त्यांची एक दिलदार बाजू प्रेक्षकांसमोर मांडली. दीपकजींनी सादर केलेल्या निळू फुले, श्रीराम लागू, शरद पवार, अटलबिहारी वाजपेयी हया प्रसिध्द व्यक्तिमत्त्वांच्या नकलांनी व निरनिराळे फोन संवाद, बोलीभाषेतील गमतींनी तर प्रेक्षकांची हसून हसून पुरेवाट लागली. ही मैफल त्यागराजजींच्या गीतांनी सुमधुर केली. त्यांच्या 'एक चतुर नार' ला प्रेक्षकांची मनपसंद दाद लाभली. त्यागराजजींच्या स्वराला स्थानिक कलाकार प्रियांका, तेजस व अच्युत टोपे यांनी वाद्यांची उत्तम साथ दिली. अशा या रंगारंग गजऱ्यात प्रेक्षकांना अभिनय, शब्द, सूर, नकला, किस्से अशा कलेच्या विविध फुलांची एक अनोखीच गुंफण पहायला मिळाली.

गजऱ्यानंतरच्या मध्यांतरात मंडळाचे अध्यक्ष अनिरुध्द किन्रे यांनी २००८च्या कार्यकारी मंडळाची थोडक्यात ओळख करुन दिली. त्यानंतर सर्वांनी उषा फुड्सचे लज्जतदार स्नॅक्स व चहाकॉफीचा आस्वाद घेतला. मध्यांतरानंतर 'वासुदेव बळवंत फडके' हा रमेश देव निर्मित चित्रपट दाखविण्यात आला. ब्रिटिश राजवटीत घेऊन जाणाऱ्या या चित्रपटात अजिंक्य देवने साकारलेल्या क्रांतिकारी वासुदेवाच्या अभिनयाला प्रेक्षकांनी खूप वाखाणले.

सुमारे १५० लोकांच्या उपस्थितीत खुसखुशीत गजरा आणि चित्रपट 'वासुदेव बळवंत फडके' हा महाराष्ट्र मंडळ न्यूयॉर्क २००८ चा दुसरा कार्यक्रम चांगलाच रंगला.

अर्चना सिधये
Secretary, MMNY